# जाहीर नोटीस
# प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, .....

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथील आस्थापना विभाग, वित्त विभाग व न्याय विभाग येथे खाली नमुद केलेल्या संगणक टोनर रिफिलिंगची व तद्नुषंगाने दुरुस्तीसाठी आवश्यक वस्तु बसविणेकरिता वार्षिक करार करणेसाठी दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.क. | वस्तुचा तपशील | दर प्रतिनग रुपये | | |
|---|---|---|---|---|
| | | कॅनॉन | एच.पी. | क्योसेरा |
| १ | कॉम्प्युटर लेझर प्रिंटरचे टोनर रिफिलींग | | | |
| २ | मॅग्नेटीक रोलर | | | |
| ३ | ड्रम | | | |
| ४ | पी.सी.आर. | | | |
| ५ | डॉक्टर ब्लेड | | | |
| ६ | वायफर ब्लेड | | | |
| ७ | चिप | | | |

तरी ज्या कोणाला वर नमुद वस्तू या जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे योग्य दरात उधारीने पुरविणे व लेजर प्रिंटर व क्योसेरा टोनर रिफिलिंग करुन देणे शक्य असेल त्यांनी निविदा खालील अटी व शर्तीस अधीन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासून आठ दिवसांचे आत म्हणजेच १०/१२/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून द्यावीत.

## दरपत्रकांबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे.

२. दरपत्रक बंद लखोटयातून असावे व लखोटा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश रत्नागिरी यांचे नावे नमूद असावा. लखोटयावर 'संगणक प्रिंटर व वस्तुंचे दरपत्रक' असे नमूद असावे.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही/ग्राहय धरले जाणार नाही.

४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक व वस्तूचा दर्जा चांगला असेल असे दरपत्रक असेल त्या दरपत्रकाचा विचार करणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. पुरविणेत आलेल्या वस्तु या चांगल्या स्थितीत असणे आवश्यक आहे. संगणक लेझर प्रिंटर खराब निघाल्यास त्या नव्याने देणे आवश्यक आहे.

६. दरपत्रक देणा—या व्यक्तिने आपले दुकानाचे लायसन्सची झेरॉक्स प्रत, पॅन कार्डची झेरॉक्स प्रत, पासबुकची झेरॉक्स प्रत व रद्द केलेला चेक दरपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे.

७. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रक नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील..

आज दि. ०३/१२/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**दिनांक— ०३/१२/२०२४.**

**प्रबंधक,**
**जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.**

म.जा.क्र. वित्त/ ६५८५ /२०२४
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दि. ०३/१२/२०२४

**<u>प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दी करिता:—</u>**

१.सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी यांजकडे